खे.ता.शि.प्र.मंडळाचे

# साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालय

राजगुरुनगर

## वाणिज्य मंडळ (Commerce Association)

## २०२२-२३ / सत्र २

## अहवाल

**दिनांक :- ०८/०५/२०२३**

शैक्षणिक वर्ष 2022-23 च्या द्वितीय सत्रातील वाणिज्य मंडळाचे कामकाज पुढील पद्धतीने यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आले. वाणिज्य शाखेमध्ये प्रथम वर्ष वर्गामध्ये 203 विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेला आहे. तसेच द्वितीय वर्ष वाणिज्य वर्गामध्ये 198 विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेला आहे आणि तृतीय वर्ष वाणिज्य वर्गामध्ये 188 विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेला आहे.तसेच पदव्युत्तर विभागामध्ये 60 (एम.कॉम.) विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे.

महाविद्यालयामध्ये वाणिज्य शाखेत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची संख्या सर्वात जास्त असल्यामुळे विद्यार्थ्यांना उत्कृष्ट शिक्षणाचा लाभ घेता यावा यासाठी वाणिज्य मंडळाच्या अंतर्गत पुढील काही उपक्रम घेण्यात आले.

वार सोमवार, दिनांक **27 फेब्रुवारी 2023** रोजी वाणिज्य विभाग आणि मराठी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने **मराठी भाषा गौरव दिन** साजरा करण्यात आला. मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी मराठी भाषेवर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या व्याख्यानासाठी ज्येष्ठ साहित्यिक प्राध्यापक साईनाथ पाचारणे सर यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आलेले होते.

**27 फेब्रुवारी 2023,** वार सोमवार रोजी वाणिज्य विभागाअंतर्गत शैक्षणिक वर्ष 2020-21 आणि २०२१-२२ मधील प्रथम वर्ष वाणिज्य वर्गाच्या उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांसाठी मूल्यवर्धित कोर्सच्या प्रमाणपत्राच्या वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. शैक्षणिक वर्ष 2020-21 आणि २०२१-२२ मधील प्रथम सत्रासाठी **Employability Skill Enhancement Program आणि द्वितीय सत्रासाठी Computerized Accounting** हे मूल्यवर्धित कोर्स विद्यार्थ्यांसाठी

PRINCIPAL
K.T.S.P. Mandal's
Sahebraoj. Buttepatil Mahavidyalaya
Rajgurunagar ... Pune

राबविला होता. या कोर्समध्ये उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले. मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधून आजच्या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्राध्यापक साईनाथ पाचारणे आणि रसायनशास्त्र विभागप्रमुख प्राध्यापिका कोल्हे मॅडम आणि इंग्रजी विभागप्रमुख प्राध्यापिका काठे मॅडम यांच्या हस्ते देखील काही विद्यार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरूपामध्ये प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमासाठी मागील वर्षी प्रथम वर्ष वाणिज्य वर्गात शिकत असलेले जवळपास 90 विद्यार्थी उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रमाणपत्राचा वाटपाचा कार्यक्रम प्रातिनिधिक स्वरूपामध्ये झाल्यानंतर सर्व उपस्थित असलेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले.

वार गुरुवार, दिनांक **2 मार्च 2023** रोजी, वाणिज्य विभागाअंतर्गत वाणिज्य विभागातील सर्व विद्यार्थ्यांसाठी **"एम.बी.ए. या क्षेत्रातील करिअरच्या संधी"** या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या व्याख्यानासाठी प्रमुख पाहुणे म्हणून एस एन जी इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड रिसर्च या संस्थेचे डायरेक्टर डॉ. एस. जी. वाळके होते. तसेच त्यांच्या समवेत याच एस. एन. जी. इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड रिसर्च या संस्थेतील प्राध्यापक डॉ. स्वप्निल शहा आणि तांत्रिक मदतनीस अमित आवारी हे देखील या कार्यक्रमासाठी उपस्थित होते.

वार शनिवार, **दिनांक 25 मार्च 2023** रोजी वाणिज्य विभागाअंतर्गत विद्यार्थ्यांना **SAP Career and Job opportunities in IT sector** या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या व्याख्यानासाठी प्रमुख वक्ते म्हणून श्री. नवनाथ उभे ( SAP-Finanace Consultant-IBM) तसेच श्री. स्वप्निल गाडगे (SAP -Material Management Consultant) लाभलेले होते. विद्यार्थ्यांना त्यांचे ग्रॅज्युएशन पूर्ण झाल्यानंतर आयटी सेक्टर मध्ये करिअरच्या संधी याबाबत खूप चांगल्या पद्धतीने योग्य असे मार्गदर्शन करण्यात आले. SAP म्हणजे काय आणि त्याचे महत्त्व तसेच त्याचा उपयोग आणि त्यासाठी आवश्यक असणारी कौशल्य याबद्दल उत्कृष्ट मार्गदर्शन श्री. नवनाथ उभे आणि श्री. स्वप्निल गाडगे यांनी विद्यार्थ्यांना केले. तसेच आयटी क्षेत्रामध्ये विद्यार्थ्यांनी करिअरच्या संधी कशा साधाव्यात याबद्दल देखील उत्कृष्ट असे मार्गदर्शन केले. व्याख्यान झाल्यानंतर पंधरा मिनिटे प्रश्न उत्तराचा कार्यक्रम देखील झाला. यामध्ये विद्यार्थ्यांना ज्या काही शंका होत्या त्याबद्दल श्री. नवनाथ उभे आणि श्री. स्वप्निल गाडगे यांनी व्यवस्थितरित्या शंकांचे निरसन केले.

द्वितीय वर्ष वाणिज्य विभागातील विद्यार्थ्यांनी **औद्योगिक क्षेत्र भेट** या उपक्रमानिमित्ताने **२५ मार्च २०२३** रोजी पराग मिल्क अवसरी फाटा येथे भेट देऊन दुधापासून तयार होणाऱ्या दुग्धजन्य पदार्थांची माहिती समजून घेतली व मोरडे फ्रुटस प्रायव्हेट लिमिटेड या ठिकाणी जाऊन फळांपासून

PRINCIPAL
K.T.S.P. Mandal's